पनवेल महानगरपालिका, पनवेल
जा.क्र.पमपा/मुख्यालय/ १०८५/२०२०
दिनांक :- १८/०३/२०२०

**अत्यंत महत्वाचे / तातडीचे :**

# आदेश

**विषय** :- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

**वाचा** :- १) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग पत्र क्र. कोरोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १४ मार्च, २०२०
२) महाराष्ट्र शासनाचे क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४३१/नवि-२०, नविवि, दिनांक १४ मार्च, २०२०
३) साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भांकित आदेशाच्या अनुषंगाने कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्याअर्थी, नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी दिनांक २०/०३/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून पनवेल महानगरपालिका हद्दीतील **जिवनावश्यक वस्तु, बेकरी, दुग्धजन्य दुकाने (डेरी), किराणा दुकाने, मेडीकल स्टोर्स, रुग्णालय / क्लिनिक, भाजीपाला इ. खाद्य पदार्थ आस्थापना** सोडून अन्य सर्व व्यावसायिक आस्थापना / दुकाने ही दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावीत.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारे संबंधित व्यावसायिक आस्थापना / दुकाने यांचे मालक, भारतीय दंडसंहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम, १८८ नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

(गणेश देशमुख)
आयुक्त,
पनवेल महानगरपालिका

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :**

१. उपायुक्त / सहायक आयुक्त / विभाग प्रमुख (सर्व),
२. वैद्यकीय अधिकारी (आरोग्य विभाग)
३. प्रभाग समिती अ, ब, क,ड यांनी उपरोक्त नुसार तात्काळ कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
४. श्री/ श्रीम./ मे./ प्रो.प्रा. ______________________

यांनी महानगरपालिका आयुक्त यांचे उपरोक्त आदेशानुसार तात्काळ पुर्तता करावी.

**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका करीता**

Scanned with